पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/१२/२०२३
## दि.२०/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३४०/२०२३,भादविक ३८०,४५४,४५७. |
| **फिर्यादी** | संतोष देशमुख,वय ४९ वर्ष रा.पर्वती दर्शन,पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१२/२०२३ रोजी रात्री २१/०० ते दिनांक १७/१२/२०२३ रोजी स.०८/००वा.सुमा.खंडोबा मंदिर स्वारगेट येथे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद मंदिराचे विश्वस्त असुन नमुद मंदिराच्या बाहेरील मेनगेटच्या भिंतीवर कोणीतरी अज्ञात इसम चढून आतमध्ये येवुन मंदिरात प्रवेश करून मंदिरातील दानपेटीचे लोखंडी कुलुप तोडून त्यामधील ६०,०००/- रु.रोख घरफोडी करून चोरून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.प्रशांत संदे मो.नं.९४२२४२२५४२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३८३/२०२३,भादविक ३७९,४६४,४६५,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | एक डॉक्टर वय २६ वर्षे,रा.रास्तापेठ,पुणे |
| **आरोपीत** | प्रकाश पांडुरंग मोंडकर,वय ३४,रा.मु.पो.वाघेरी,ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग (अटक)व एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१२/२०२३ रोजी वैदयकिय अधिक्षक यांचे कार्यालयात, ससुन हॉस्पीटल पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वर नमुद ठिकाणी आर.एम.ओ.म्हणुन काम पाहत असुन नमुद इसम हे मेडीकल फिटनेस साठी ससुन हॉस्पीटल येथे येवुन तेथील डॉक्टर व कर्मचारी यांची नजर चुकवुन तेथील शिक्क्याची चोरी करुन सदर शिक्क्याच्या आधारे बनावट मेडीकल फिटनेस सर्टीफिकेट तयार केलेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.शरद माने मो.नं ८८८८८३४५७५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुश्रृंगी पो स्टे ९२६/२०२३,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २५ वर्षे रा.बाणेर पुणे |
| **आरोपीत** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०२० ते दि.२०/१२/२०२३ शिवनेरी पार्क बालेवाडी पुणे येथे व डिएसके विश्व धायरी व नांदेड सिटी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद तीन इसम फिर्यादी यांना गुंतवणुक केलेल्या रक्कमेवर जास्त परतावा देता असे फिर्यादी यांना अमिष दाखवुन त्यांचेकडुन वेळोवेळी एकुण १ कोटी ८० लाख रुपये गुंतवणुकी साठी घेऊन ते परत न करता चेक देऊन ते बाऊन्स करून फिर्यादी यांची आर्थीक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.राजकुमार केंद्रे मो.नं ८८८८९९३३९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**